
लोकसत्ता पु-पा-७.

# बिबट्याच्या दहशतीने रो-रोच्या दोन फेऱ्या रद्द

## मागील वीस दिवसांपासून बिबट्या मोकाट

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**वसई :** वसईच्या किल्ला परिसरातील बिबट्याची दहशत अद्याप कायम आहे. हा बिबट्या मागील वीस दिवसांपासून मोकाट असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून सध्याकाळच्या रो-रो सेवेच्या दोन फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बिबट्याच्या दहशतीमुळे सार्वजनिक वाहतूक सेवा बंद करण्याची ही पहिलीचे वेळ आहे.


वसई -भाईंदर या भागातील नागरिकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र सागरी मंडळातर्फे वसई- भाईंदर दरम्यान रो-रो सेवा सुरू करण्यात आली आहे. वसई किल्ला परिसरात असलेल्या जेटीतून रो-रो सेवा सुरू होते. मात्र या किल्ल्यात २९ मार्च रोजी बिबट्या आढळला होता. तेव्हापासून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अजूनही या बिबट्याचा शोध लागला नाही. वनविभागाने बिबट्याला पकडण्यासाठी ट्रॅप कॅमेरे, आवश्यक ठिकाणी पजरे लावले आहेत. परंतु बिबट्या बाहेर येण्याच्या वेळेत सातत्याने मानवी वर्दळ असते. याशिवाय रो-रो सेवेकडे जाणारा मार्ग सुद्धा किल्ल्यातून जात आहे. त्यामुळे सायंकाळी सुद्धा वाहनांची मोठी वर्दळ असते. ही मानवी वर्दळ रोखण्यासाठी काही दिवस रो-रो सेवेच्या फेऱ्या रद्द करण्यात याव्या असे पत्र वनविभागाच्या मांडवी वनपरिक्षेत्र अधिकारी श्वेता आडे यांनी महाराष्ट्र सागरी मंडळाला दिले होते.

याशिवाय वसईच्या उपविभागीय कार्यालयात ग्रामस्थ, वनविभाग, रोरो सेवा चालक यांच्यात पार पडलेल्या संयुक्त बैठकीत बिबट्या सापडत नाही तोपर्यंत सेवा बंद करण्याची मागणी करण्यात आली होती. किमान सायंकाळी असलेल्या दोन फेऱ्या रद्द करण्यात याव्या अशी सूचना रो-रो व्यवस्थापकांना करण्यात आली होती त्याच अनुषंगाने वसई ते भाईंदर या रो-रो सेवेच्या शेवटच्या दोन फेऱ्या १३ एप्रिलपासून रद्द केल्या आहेत.

५.१५ आणि ६.४५ अशा फेऱ्या रद्द केल्या असून वसईवरून ३.४५ ची शेवटची फेरी असेल तर भाईंदर वरून ४.३० वाजता असणार असल्याची माहिती रो-रो व्यवस्थापक यांच्यामार्फत देण्यात आली आहे. यामुळे संध्याकाळच्या वेळेस बिबट्याकडून कुणावरही हल्ला होणार नाही, असा विश्वास रो-रोच्या व्यवस्थापकांनी व्यक्त केला.

### प्रवाशांची गैरसोय

**वसई किल्ल्यात आढळून आलेल्या बिबट्याला वीस दिवस उलटून गेल्यानंतर ही जेरबंद करण्यात वनविभागाला अपयश आले आहे. बिबट्याला पकडण्यासाठी आता रो-रो सेवा ही सायंकाळच्या सुमारास बंद ठेवावी लागत आहे. त्यामुळे सायंकाळी वसई भाईंदर असा रोरो ने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मात्र गैरसोय होऊ लागली आहे. तर दुसरीकडे सायंकाळी काही प्रवासी रो-रो सेवेसाठी जात आहेत त्यांच्यात आणि तिकीट विक्रेते यांच्यात ही सेवा बंद करण्यावरून वादविवाद होऊ लागले आहेत.**



लोकसत्ता पृ.पा.७.

# भाईंदरमध्ये पुढील आठवड्यापासून नालेसफाई

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील मोठ्या नाल्यांच्या सफाईचे काम पुढील आठवड्यापासून हाती घेतले जाणार आहे. लहान नाल्याची सफाई आधीपासून होत असल्यामुळे यंदा मे महिन्याच्या अंतीच संपूर्ण काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे.

मिरा-भाईंदर शहरात लहान-मोठे असे एकूण १५५ नाले आहेत. या नाल्यात साचलेल्या गाळ व कचऱ्यामुळे पावसाळ्यात पाणी साचण्याची शक्यता असते. म्हणून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी प्रशासनाकडून नाले सफाईचे काम केले जाते. मात्र, त्यांतरही शहरातील काही भागात भौगोलिक परिस्थिती व इतर कारणांमुळे पाणी तुंबते. त्यामुळे नालेसफाईचे काम हे दरवर्षी विविध कारणास्तव वादात सापडत आले आहे. प्रत्यक्षात या कामाला १० मे नंतर सुरुवात केली जाते. मात्र यंदा नाल्यांची सफाई चांगल्या पद्धतीने करण्यासाठी २१ एप्रिल पासूनच कामास सुरुवात केली जाणार आहे. यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया देखील पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर यांनी दिली आहे.

## ३.७५ कोटींची तरतूद

**शहरातील नाल्याच्या सफाईसाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात यंदा ३ कोटी ७५ लाखाची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षी हा खर्च जवळपास पाच कोटीच्या वर गेला होता. मात्र यावर्षी शहरातील अंतर्गत लहान नाल्याची सातत्याने सफाई करण्याचा निर्णय आयुक्त काटकर यांनी घेतला असल्यामुळे खर्चात मोठी बचत झाल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.**

# मांसविक्री दुकानांवरील बंदी नियमबाह्य

## बंदी मागे घेण्याची महाराष्ट्र एकीकरण समितीची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** रविवारी महावीर जयंती निमित्ताने मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याच्या पालिकेच्या निर्णयाविरोधात संताप व्यक्त होऊ लागला आहे. शासन निर्णयच उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. त्यामुळे ही बंदी नियमबाह्य असून ती तात्काळ उठवावी, अशी मागणी महाराष्ट्र एकीकरण समितीने केली आहे.

महावीर जयंतीनिमित्त रविवारी मांसविक्रीची दुकाने बंद ठेवावीत असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे. याविरुद्ध मराठी एकीकरण समिती, वसई-विरार विभाग आक्रमक झालेला आहे. ज्या २००३ च्या नियमाचा संदर्भ देऊन पालिकेने मांसविक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश काढली आहे. तो नियमच मुंबई उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवलेला असल्याने पालिकेचा हा निर्णयच नियमबाह्य असल्याचा दावा समितीने केलेला आहे. समितीने यासंबंधी शासनपरिपत्रके. नियमावल्या या पालिकेचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांना पाठवल्या असून बंदी मागे घेण्याची मागणी केली आहे.

मुंबई

लोकसत्ता पृ.पा.४.

# ऑनलाइन हळद विक्रीत फसवणूक

## २६ लाख रुपये किमतीच्या ३५ टन हळदीसह एकजण पसार

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मुंबईतील एका हळद व्यापाऱ्याला ऑनलाइन हळद विकणे चांगलेच महागात पडले आहे. एका व्यक्तीने या व्यापाऱ्याकडून तब्बल २६ लाख रुपये किमतीची ३५ टन हळद विकत घेतली आणि पैसे न देताच पोबारा केला. या प्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मुंबईच्या सायन येथे राहणारे अजय गुप्ता यांचा हळदीचा व्यापार आहे. इंडिया मार्ट या संकेतस्थळावरून ते हळदीची विक्री करत असतात. काही दिवसांपूर्वी गुप्ता यांना विनोद जैन नावाच्या व्यक्तीने संपर्क करून ३५ टन हळद विकत घ्यायची असल्याचे सांगितले. त्यानुसार गुप्ता यांच्या कंपनीने मीरा रोड येथील पत्त्यावर ३५ टन हळद पोहोचवली. त्याची बाजारभावाप्रमाणे किंमत २६ लाख ४६ हजार आहे. मात्र हळद हाती लागल्यानंतर जैन याने कंपनीला पैसे देण्यास टाळाटाळ केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुप्ता यांनी काशिगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून काशिगाव पोलिसांनी विनोद जैन याच्याविरोधात ४२० अन्वये फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती काशिगाव पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत लोंढे यांनी दिली.

CamScanner

लोकमत ५.५.१९.

# टँकरच्या भीषण धडकेत आजी-नातवाचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

विरार : विरार पश्चिमेच्या बचराज इमारतीत राहणारा लहान मुलगा आणि त्याच्या आजीचा टँकरने दिलेल्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. विवान यादव (वय ५) आणि त्याची आजी अमरावती यादव (वय ६०) अशी दोघांची नावे आहेत. घटनेची माहिती मिळताच अर्नाळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून टँकर ताब्यात घेतला आहे.

शुक्रवारी दुपारी आजी अमरावती ही आपल्या नातू विवान याला शाळेत सोडण्यासाठी जात होती. यावेळी वायके इमारतीजवळील पाण्याच्या टँकरने दिलेल्या धडकेत विवान हा थेट टायरखाली आल्याने चिरडून त्याचा जागीच मृत्यू झाला, तर आजी अमरावती यांना गंभीर दुखापत झाली होती. या घटनेनंतर टँकरचालक टँकर तिथेच सोडून पळून गेला. मात्र, स्थानिकांनी रुग्णवाहिका बोलावून जवळच्याच रुग्णालयात आजी अमरावती यांना दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला.



या अपघातात यादव कुटुंबातील दोघांचा मृत्यू झाल्यामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## बेदरकारपणे टँकर चालवण्याचे प्रमाण वाढले

- स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, बहुतांश टँकर चालक दररोज असेच बेदरकारपणे टँकर चालवत असतात. काही जण तर मद्यप्राशन केलेले असतात, असेही स्थानिकांचे म्हणणे आहे.
- **वाहतूक पोलिस तसेच स्थानिक पोलिस याकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे टँकरच्या धडकेत मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे, असा आरोप नागरिकांनी केला आहे.**

पुण्यनगरी ५.५.१९.

# वाहतूक विभागाकडून रस्ते खोदकामाची आढावा बैठक

**मीरारोड:** मीरा भाईंदर शहरात १६ एप्रिल रोजी शहराअंतर्गत रस्ते खोदकामाची मान्सूनपूर्व आढावा बैठक काशिमीरा वाहतूक विभाग कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यात शहरात अंतर्गत सुरु असलेले सिमेंट रस्ते खोदाई व सूर्या प्रकल्प पाणी पुरवठा योजनेचे अंतर्गत पिण्याचे पाणी पुरवठ्याची वितरण नवीन जलवाहिनी टाकण्यासाठी रस्ता खोदकाम चालू असून त्या रस्ते खोदकामाची कामे मान्सूनपूर्व करण्याकरता बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीमध्ये उपस्थित असलेले विविध रस्ते बांधकाम करणारे कंपनीचे प्रतिनिधी यांना मीरा भाईंदर शहरातील चालू असलेले रस्ते खोदकामाची कामे ही मान्सूनपूर्व वेळेत पूर्ण करण्या बाबत तसेच उर्वरित असलेले काम हे पावसाळा संपल्यानंतरच चालू करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. ज्या ठिकाणी कामे चालू आहेत त्या ठिकाणी वाहतूक सुरळीत राहण्यासाठी व नागरिकांची गैरसोय होवू नये म्हणून ट्रॅफिक वार्डन ठेवणे, कामाच्या ठिकाणी बॅरिकेटींग करणे, रेडियम पटटी, नाईट ब्लिंकर्स, वाहतूक कोन यांचा वापर करण्याबाबत बैठकीमध्ये उपस्थित असलेले बांधकाम करणारे कंपनीचे प्रतिनिधी यांना सुचना दिल्या आहेत. या मान्सूनपूर्व आढावा बैठकीला मुख्यालयाचे पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त वाहतूक विलास सानप यांच्या उपस्थितीमध्ये वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी आणि काही ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

लग्नसराईसाठी ऑफर

म. टा. ५.५.१९.

# भाईंदरच्या सोने व्यापाऱ्याला ६३ लाखांना फसविले

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

## पुण्यातील दाम्पत्याकडून फसवणूक

भाईंदरमधील एका सोने व्यापाऱ्याची तब्बल ६३ लाखांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पुण्यात सोन्याचे दुकान चालवणाऱ्या एका व्यापारी जोडप्याने ही फसवणूक केली आहे. याप्रकरणी विनोद व अश्विनी कुलकर्णी यांच्याविरोधात नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पुर्वेला दीपक जैन यांचे सोने-चांदीचे एक दुकान आहे. ते व्यापाऱ्यांना घाऊक दराने सोन्याची विक्रीही करतात. पुण्यातील लोणी काळभोर भागात सोन्याचे दुकान असणारे विनोद व अश्विनी कुलकर्णी यांनी त्यांच्याकडून मधल्या काळात रोखीने काही सोने खरेदी केले होते. यादरम्यान कुलकर्णी दाम्पत्याशी दीपक यांचा परिचय झाला. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात सोन्याची मोठी ऑर्डर असल्याचे कुलकर्णी दाम्पत्याने दीपक यांना सांगितले. त्यासाठी आवश्यक सोने द्या, दोन-तीन दिवसांत त्याचे पैसे देतो, असेही या दाम्पत्याने सांगितले. म्हणून दीपक यांनी प्रथम कुलकर्णी यांच्या दुकानाविषयी खात्री केली. त्यावर विश्वास बसल्यानंतर जैन यांनी एक किलो वजनाच्या सोन्याच्या साखळ्या कुलकर्णी यांना दिल्या.

त्याचे ६३ लाख रूपये घेण्यासाठी तीन दिवसांनी दीपक यांनी फोन केला असता, विनोद यांनी तुमचे सोने परत करतो, असे आधी सांगितले. त्याकरीता दीपक यांनी पुन्हा फोन केला असता त्यांनी फोन घेणे बंद केले. त्यांच्या पत्नी अश्विनी यांच्याकडून वेगवेगळी उत्तर दिले जात होती. त्यामुळे अखेर आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्याने दीपक यांनी नवघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यावरून आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

लोकमत पा. नं. II

# आचारसंहितेचा भंग झाल्यास कठोर शिक्षा

## अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी कुलकर्णी यांचा इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आचारसंहितेच्या काळात



मतदारांवर प्रभाव टाकणारी कोणतीही कृती आचारसंहितेचा भंग असून, आचारसंहितेचा भंग करणाऱ्या घटकास कठोर शिक्षा होऊ शकते, अशी माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक आयुक्त डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.

आचारसंहिता लागू झाल्यावर राजकीय पक्षांनी काय करावे, काय टाळावे, या संहितेचे महत्त्व काय आहे आदी मुद्यावर डॉ. कुलकर्णी यांनी विस्तृत भाष्य केले. ते म्हणाले की, देशातील सर्व राजकीय पक्ष आणि निवडणुकीशी संबंधित सर्व घटक यांच्या सहमतीने आचारसंहितेचा मसुदा तयार केला आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राजकीय नेत्यांनी अधिक प्रगल्भता दाखविण्याची गरज असून प्रचार करताना धोरणे आणि दृष्टिकोन याबाबत प्रचार असावा. प्रलोभने किंवा धाक नसावा. विरुद्ध पक्षाची आणि उमेदवारांची धोरणे आणि दृष्टिकोनावर टीका करता येईल पण वैयक्तिक किंवा गलिच्छ पद्धतीचा प्रचार करणे अपेक्षित नाही. निवडणुकीत विरोधात उभे असलेले उमेदवार एकमेकांचे शत्रू आहेत असे समजण्याचे कारण नाही. इतर पक्षांचे नेते किंवा इतर उमेदवार यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या वैयक्तिक बाबींवर टीका आणि धार्मिक स्थळांवर प्रचार हा आचारसंहितेचा भंग मानला जातो.

आचारसंहितेचा काळ म्हणजे कामकाज ठप्प अशी एक भावना आहे. मात्र, यावर भाष्य करताना डॉ. कुलकर्णी म्हणाले की, हे सरसकट लागू नाही. ज्या निर्णयांचा मतदानावर प्रभाव पडले अशी कामे व घोषणा करण्यास बंदी आहे. मात्र, नैसर्गिक आपत्ती आल्यास आवश्यक असणारी अनुदाने आणि पीडितांना दिलासा रक्कम पूर्वीच्याच दराने आणि प्रमाणात आयोगास कळवून देता येते. दरांमध्ये आणि प्रमाणामध्ये बदल करावयाचा असल्यास मात्र आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. मुख्यमंत्री सहायता निधीतून गरजू आणि पात्र रुग्णांची बिले रुग्णालयांना थेट अदा करता येतात.

### आचारसंहिता कधी संपते व कुणाला लागू आहे?

- निवडणुकीची घोषणा होताच क्षणी आचारसंहिता लागू होते व नवी लोकसभा अस्तित्वात आल्यावर आचारसंहितेचा कालावधी संपतो.
- आचारसंहितेच्या तरतुदींची पूर्तता केंद्र सरकार, राज्य सरकार याचबरोबर सर्व महामंडळे आणि शासकीय अर्थसहाय्यित सर्व संस्था यांना करावी लागते.

### पैसे घेऊन मतदान हा राज्यघटनेचा अपमान !

मतदारांना आर्थिकदृष्टया प्रलोभन दाखविणे प्रतिबंधित आहे. मतदाराने आपल्या मताची अशी किंमत घेणे हा तर राज्यघटनेचा अपमान असल्याचे डॉ. कुलकर्णी म्हणाले.

### सी-व्हीजिल ॲप महत्त्वाचे...

निवडणूक आयोगाने नागरिकांसाठी सी-व्हीजिल हे ॲप तयार केले आहे. त्यावर कोणताही नागरिक आचारसंहितेच्या भंगाचा प्रकार दिसला तर तक्रार करु शकतो. ज्या ठिकाणावर हा भंग घडत असेल तिथे उभे राहून छायाचित्र पाठवू शकतो. ही तक्रार लगोलग त्या मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचते. या निवडणुकीसाठी राज्यात एकूण १६५६ फिरती आणि २०९६ स्थिर पथके कार्यान्वित आहेत.

CamScanner

लोकमत पु-पा-४.

# अय्याशीसाठी आयटी इंजिनीअर क्रेडिट कार्ड चोरून हडपायचा पैसे

## आरोपीला हरयाणामधून केली अटक; आठ गुन्हे उघडकीस

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** जुगाराचे व्यसन आणि अय्याशीसाठी मोबाइलसह क्रेडिट कार्ड व डेबिट कार्ड चोरून त्याचे पासवर्ड बदलत पैसे काढणाऱ्या, दागिने खरेदी करणाऱ्या आयटी इंजिनिअरला हरयाणा येथून भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे. ट्विंकल अर्जुन अरोरा (वय ३४, रा. फरिदाबाद, हरयाणा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडील चौकशीत अरोरा याने भाईंदरसह मुंबईच्या आझाद मैदान, वांद्रे, अंधेरी पोलिस ठाणे हद्दीत, तसेच दिल्लीच्या वसंत विहार पोलिस ठाणे हद्दीत ३ आणि पुण्याच्या बिबवेवाडी पोलिस ठाणे हद्दीत १ असे एकूण ८ गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे.

भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्ट, इंद्रप्रस्थमध्ये राहणाऱ्या अमित अग्रवाल यांच्या संकुलाची क्रिकेट मॅच भाईंदर पश्चिमेच्या एका टर्फमध्ये ३१ मार्च रोजी होती.



- त्यांची बॅग, आतील मोबाइल, क्रेडिट आणि डेबिट कार्डसह चोरीला गेली. त्या कार्डच्या आधारे ४ लाख ४ हजार रुपयांचा व्यवहार करण्यात आला होता.
- **याप्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन पथकाने तपास सुरू केला होता. पोलिसांनी सीसीटीव्हीचा मागोवा घेत थेट अंधेरीपर्यंतचे फुटेज पडताळले असता त्यात संशियत आढळून आला. त्याचा तपास केला असता त्याचे नाव ट्विंकल अर्जुन अरोरा (३४, रा. स्ट्रीट क्र. २२, भिकम कॉलनी, फरिदाबाद, हरयाणा) येथील असल्याचे स्पष्ट झाले.**


### आरोपीला २३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी

प्रसाद गोवले व पोलिस पथकाने अरोरा याचा हरयाणा येथे जाऊन शोध घेण्यास सुरुवात केली. तो फरिदाबादच्या सेक्टर ७३ मधील हाउस नं. १४९५ मध्ये पोलिसांना सापडला. अरोरा याला २३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे.

### टर्फमधील मॅचची माहिती घेऊन चोरायचा बॅग

अटक आरोपी अरोरा हा सराईत असून आयटी इंजिनिअर आहे. त्याला ऑनलाइन जुगाराचे व्यसन असल्याने तसेच अय्याशीसाठी तो चोऱ्या करत असतो. टर्फमधील मॅचची माहिती घेऊन तेथे जातो आणि तेथील बॅगमधील मोबाइल, क्रेडिट - डेबिट कार्ड चोरतो. मोबाइल मिळाल्याने कॉल सेंटरला कॉल करून कार्डचा पिन बदलून घेतो. नंतर त्याद्वारे रोख काढणे, दागिने वा अन्य वस्तू खरेदी करणे अशा प्रकारे कार्डधारकांची लाखोंची फसवणूक त्याने केली आहे.

### या पथकाने केला तपास



उपायुक्त प्रकाश गायकवाड, सहायक आयुक्त दीपाली खन्ना, वरिष्ठ पोलिस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी, पोलिस निरीक्षक विवेक सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रसाद गोवलेंसह रवींद्र भालेराव, राजेश श्रीवास्तव, किरण पवार, सुशील पवार, रामनाथ शिंदे, संजय चव्हाण आणि सलमान पटवे यांच्या पथकाने तपास पूर्ण केला.

लोकमत

पु-पा.

2. <— —> 9

## एटीएम कार्ड चोरून निवृत्त पोलिसाला गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : एटीएम कार्ड चोरून एका निवृत्त पोलिसाची हजारो रुपयांची फसवणूक झाली आहे.

भाईंदर पूर्व सुदर्शन लेन, भालचंद्र कॉम्प्लेक्समध्ये ५९ वर्षीय सेवानिवृत्त पोलिस अनिल जाधव राहतात. बंदरवाडी एचडीएफसी बँकेच्या एटीएममध्ये ते मिनी ट्रान्सफर पावती काढण्यासाठी गेले असता, मशीनमध्ये एटीएम कार्ड अडकले. ते काढण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी तेथे एक अनोळखी व्यक्ती मदतीच्या बहाण्याने आला. व त्याने पिन क्रमांक दाबून कॅन्सल बटण दाबण्यास सांगितले असता जाधव यांनी तसे केले. पण कार्ड न निघाल्याने ते ब्लॉक करण्याबाबत मित्राला कॉल करत बाहेर आले. ती संधी साधत त्या इसमाने कार्ड चोरून नंतर वेगवेगळ्या एटीएममधून ५० हजार रुपये काढून फसवणूक केली. नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## १० वर्षीय मुलाचे अपहरण

**नालासोपारा :** पाचअंबा परिसरात राहणाऱ्या १० वर्षांच्या अल्पवयीन मुलाचे गुरुवारी दुपारी अपहरण झाले आहे. तो राहत्या घरातून खेळण्यासाठी गेला होता, तो घरी परतलाच नाही. आरोपीने त्याला कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेल्याची शक्यता आहे. त्यामुळे मुलाच्या आईने गुरुवारी आचोळे पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## १३ वर्षीय मुलीची आत्महत्या

**नालासोपारा :** विरारच्या साईनाथनगर येथील कामधेनू अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या श्रावणी शेलार या १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलीने गळफास घेतल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तिने कोणत्या तरी कारणावरून गुरुवारी हॉलमधील पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner

लोकमत पृ.५/२.

# गावठी रिव्हॉल्व्हरसह आरोपीला ठोकल्या बेड्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पेल्हारच्या जाबरपाडा परिसरात गावठी रिव्हॉल्वरसह गुरुवारी एका आरोपीला पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. गावठी रिव्हॉल्व्हर पोलिसांनी जप्त केले आहे.

जाबरपाडा परिसरात गुरुवारी संध्याकाळी विनापरवाना गावठी रिव्हॉल्व्हर घेऊन एकजण येणार असल्याची खात्रीपूर्वक माहिती मिळाली होती. याबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी, अंमलदार यांना बातमीची सत्यता पडताळून कारवाई करण्याबाबत आदेश देण्यात आला होता. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक सोपान पाटील, पोलिस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे व पथकाने सापळा रचून आरोपी इरफान खान (वय २७) याला ताब्यात घेत त्याची अंगझडती घेतली. यावेळी त्याच्याकडे एक गावठी रिव्हॉल्व्हर मिळून आले आहे.



गावठी रिव्हॉल्व्हरसह एका आरोपीला गुरुवारी संध्याकाळी गुन्हा दाखल करून अटक केली आहे. आरोपीला वसई न्यायालयात हजर केल्यावर २० एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**- जितेंद्र वनकोटी,** वरिष्ठ पोलिस निरीक्षक, पेल्हार पोलिस ठाणे

**■ त्याच्याविरुद्ध पेल्हार पोलिस ठाण्यात आर्म ॲक्ट ३, २५ सह महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३७ (१)(३), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पेल्हार पोलिस पुढील तपास करीत आहेत.**

# मुलीचा विनयभंग; बापाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** स्वतःच्या १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलीसोबत लैंगिक चाळे करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी मीरा रोड पोलिसांनी तिच्या नराधम बापाला अटक केली आहे.

मीरा रोड भागात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला तिचा बाप ती घरात एकटी असल्याचे पाहून तिच्यासोबत अश्लील आणि लैंगिक चाळे करत होता. मार्च २०२२ पासून १६ एप्रिल २०२४ पर्यंत तिचा वासनांध बाप हा पोटच्या पोरीचे लैंगिक शोषण करत होता. हा प्रकार मुलीच्या आईच्या निदर्शनास आल्यानंतर या घृणास्पद कृत्याचा घडा फुटला. मुलीच्या आईनेच पतीविरुद्ध मीरा रोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. प्रकरणाचे गांभीर्य पाहून १८ एप्रिल रोजी पोलिसांनी पोक्सो, विनयभंगाचा गुन्हा दाखल करून वासनांध बापाला बेड्या ठोकल्या आहेत.

लोकमत पृ.५/७.

# हद्दपार केलेल्या आरोपीला अर्नाळ्यातून केली अटक

## गुन्हे शाखा युनिट तीनची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** अर्नाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून हद्दपार केलेल्या सराईत आरोपीला अटक करण्यात गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांना यश मिळाल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी शुक्रवारी दिली आहे.

आगामी लोकसभा निवडणूक शांततेत व सुरळीत पार पाडावी, या अनुषंगाने मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात फरारी आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. अर्नाळा पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात राहणारा सराईत आरोपी मुकेश उर्फ माका विनोद मांगेला (३१) याला परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त यांनी पालघर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे या जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रांच्या हद्दीतून दोन वर्षांकरिता हद्दपार केले होते.

### २० गंभीर गुन्हे दाखल

आरोपी मुकेश याच्याविरोधात अर्नाळा पोलिस ठाण्यात मारामारी, दुखापत, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, जबरी चोरी असे २० पेक्षा जास्त गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. गुरुवारी दुपारी आरोपीला ताब्यात घेतले. त्याने हद्दपार आदेशाचा भंग केल्याने अर्नाळा पोलिस ठाण्यात

### यांनी बजावली कामगिरी

अटकेची कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, उपनिरीक्षक उमेश भागवत, हवालदार अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, राकेश पवार, सुमित जाधव, सुनील पाटील, सागर सोनवणे, गणेश यादव व सायबर सेलचे संतोष चव्हाण यांनी पार पाडली आहे.

CamScanner

NBT नवभारत टाइम्स

प्रेग्नेंसी पर परिणीति चोपड़ा ने तोड़ी चुप्पी p8

# साइबर ठगी का आरोपी अरेस्ट, 8 मामलों में वांछित



निसं, मीरा-भाईंदर: भाईंदर पुलिस ने आठ अलग-अलग मामलों में वांछित साइवर ठगी के एक आरोपी को गिरफ्तार किया है। गिरफ्तार आरोपी का नाम ट्विंकल अरोरा है और फरीदावाद (हरियाणा) का निवासी है। उसने मीरा-भाईंदर, मुंवई, पुणे और दिल्ली में ठगी की कई घटनाओं को अंजाम दिया है। मुंवई में तीन और पुणे में एक मामला दर्ज है, जवकि दिल्ली के वसंत विहार में ही 3 अलग-अलग मामले दर्ज हैं। शिकायतकर्ता अमित अग्रवाल (44) का क्रिकेट खेलने के दौरान डेविट कार्ड चोरी हो गया था। इस कार्ड के जरिए लगभग 4 लाख रुपये का ट्रांजेक्शन करने की वात सामने आई थी।

• अमित तिवारी

CS CamScanner

ठाणे (महाराष्ट्र), वर्ष 3, अंक 238, शनिवार, दिनांक : 20 अप्रैल 2024 पृष्ठ - 4, मूल्य : 4/- RNI No. MAHHIN/2021/83572, GSTIN-27AAAJH0523M1ZB ठाणे, मुंबई, पालघर, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग में वितरण

दैनिक
हिन्द सागर
Web : www.hindsagar.com



वोट जरूर दें, ये भारत का भविष्य सुनिश्चित करेगा : प्रधानमंत्री मोदी P-2



कांग्रेस अपनी प्रासंगिकता खो चुकी है: राजनाथ सिंह P-2

# भाईंदर पुलिस ने शातिर अपराधी को हरियाणा से किया गिरफ्तार

विनय दूबे @ हिन्द सागर

मीरा-भाईंदरः भाईंदर परिसर में रहने वाले अमित अग्रवाल अपनी बिल्डिंग के मित्रों के साथ क्रिकेट मैच खेलने भायंदर(प.) के ब्लु पिंच टर्फ मैदान में गये थे,मैच के दौरान मौका पाकर किसी अज्ञात ने अमित का बैग चुरा कर उनके डेबिट और क्रेडिट कार्ड से 4 लाख 4 हजार रूपये का ट्रांजेक्शन कर डाला,मैच के कुछ समय पश्चात अमित ने जब देखा की उनका बैग नहीं है, और क्रेडिट कार्ड का भी उपयोग कर लिया गया है, तो आनन-फानन में अमित ने भायंदर(प.) पुलिस स्टेशन में जाकर चोरी की शिकायत दर्ज कराई।ज्ञात हो की पुलिस की टीम ने घटना स्थल पर जांच करना शुरू किया,छानबीन के दौरान घटना स्थल से मिले सीसी.टीवी फुटेज की सहायता से शातिर अपराधी ट्विंकल अरोरा की पहचान हुई, आरोपी की खोजबीन के दौरान सहायक पुलिस निरीक्षक योगेश देशमुख को गुप्त सूत्रों से मिली जानकारी से पता चला की अरोरा हरियाणा में है,तत्काल पुलिस की एक टीम हरियाणा जाकर उसे हिरासत में लेकर भायंदर लाती है,कड़ी पूछताछ के दौरान आरोपी अपना गुनाह कबूल कर लेता है।वरिष्ठ पुलिस निरीक्षक सूर्यकान्त नाईकवाडी ने बताया की ट्विंकल एक शातिर अपराधी है,अलग अलग शहर के पुलिस थानों में उसके खिलाफ कई मामले दर्ज है।भा.द.वि. धारा 379,420 के तहत मामला दर्ज कर उसे गिरफ्तार कर लिया है,और आगे की जाँच जारी है।पुलिस निरीक्षक (गुन्हा) विवेक सोनवने के मार्गदर्शन में डिटेक्शन ब्रांच के सहायक पुलिस निरीक्षक योगेश देशमुख की टीम ने उक्त कारवाई की।

CamScanner



सलमान मामले में अनमोल बिश्नोई के खिलाफ केस देखें अंदर

NBT नवभारत टाइम्स

जलवायु पर चिंतित SC ने कहा, लोग खुद को ही बर्बाद कर रहे देखें अंदर



# रिक्शे में छूटा एक लाख का गहना, पुलिस ने किया बरामद



**निसं, वसई:** पेल्हार पुलिस ने रिक्शे में छूटे एक लाख रुपये मूल्य के गहनों को 24 घंटे में बरामद कर लिया है। वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी ने बताया कि गुरुवार की दोपहर दो बजे के आसपास एक महिला नाजली अंजुम अपना बैग एक रिक्शे में भूल गई थी। उन्होंने पुलिस को सूचना दी थी। सूचना प्राप्त होते ही पुलिस हरकत में आई और 24 घंटे के अंदर ही रिक्शेवाले को ढूंढ़कर एक लाख 5 हजार रुपये मूल्य के गहनों को बरामद कर लिया।

• **अमित तिवारी**